महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९/COVID-१९-२/कॅंप पुणे

एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

दिनांक : १३/०४/२०२०

# परिपत्रक

**विषय :** करोना विषाणू (COVID-19) च्या संक्रामक गुणधर्मामुळे उत्पन्न झालेल्या आपत्कालीन परिस्थितीमधील कृतीशिल उपाय.

**संदर्भ :** १) परिपत्रक क्र. मासं/रवका/न.क्र.९/८७४९ दि. १८.०३.२०२०.
२) परिपत्रक क्र. मासं/रवका/न.क्र.९/८९२९ दि. २०.०३.२०२०.
३) परिपत्रक क्र. मासं/रवका/न.क्र.९/कॅंप पुणे दि. २२.०३.२०२०.
४) अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे दि २९.०३.२०२० चे पत्र.
५) परिपत्रक क्र. मासं/रवका/न.क्र.९/३३० दि. ३१.०३.२०२०.
६) महाराष्ट्र शासनाचे सुचना पत्र क्र DMU/२०२०/CR.९२/DisM-१ Dated १३.०४.२०२०.

सध्या जगभरात पसरलेल्या कारोना विषाणूची लागण विचारात घेता सदर रोगाचा प्रसार टाळण्यासाठी शासन स्तरावर व त्यानुषंगाने कंपनी स्तरावर प्रतिबंधात्मक उपाय योजना लागू करुन सविस्तर सूचना जारी केलेल्या आहेत. याच सूचनांचा भाग म्हणून कंपनीच्या प्रशासकीय कार्यालयात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या ५० टक्के ऐवढे मनुष्यबळ कार्यालयात उपस्थित राहण्याबाबतच्या सुचना व २५ टक्के उपस्थिती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे, पुणे पिंपरी-चिंचवड आणि नागपूर परिक्षेत्रअंतर्गत ठेवण्याबाबत सविस्तर सूचना उपरोक्त संदर्भिय क्र १ व २ अन्वये पारित करण्यात आलेल्या आहेत. तसेच संदर्भिय क्र ३ अन्वये कार्यालयीन उपस्थितीमध्ये कपात करुन ती ५ टक्के करण्याबाबत दि.३१.०३.२०२० पर्यंत लागू करण्यात आलेल्या होत्या.

२. गृह संचालनालय, भारत सरकार यांचे मार्फत दि.२५.०३.२०२० पासून पुढील २१ दिवसाचा कालावधीकरीता संपूर्ण देशभरात संचारबंदी व जमावबंदी लागू करण्यात आली होती. देशभरातील सदरील परिस्थतीचा विचार करता संदर्भीय क्र ५ अन्वये सर्व सक्षम अधिकारी हे प्रशासकीय कार्यालयामधील उपस्थिती जास्तीत जास्त ५ टक्के पर्यंत राखण्याबाबतच्या सूचना दि.१४.०४.२०२० पर्यंत सुरू ठेवून उर्वरित कर्मचारीवृंदाना "घरून काम (Work From Home)" करण्याबाबत परवानगी देवू शकतील अशा सुचना निर्गमीत करण्यात आलेल्या होत्या.

३. सद्यस्थितीत कोरोना विषाणू रोगाचा प्रसार टाळण्यासाठी महाराष्ट्र शासनाने संदर्भिय क्र ६ अन्वये दि. ३०.०४.२०२० पर्यंत Lockdown ची मुदत वाढवलेली आहे. म्हणून सर्व सक्षम अधिकारी हे प्रशासकीय कार्यालयामधील उपस्थिती जास्तीत जास्त ५ टक्के पुढे सुरू ठेवून उर्वरित कर्मचारीवृंदाना **"घरून काम (Work From Home)"** परवानगी देवू शकतील. सदरच्या सूचना या कंपनीच्या कार्यक्षेमतेमध्ये बाधा न येता दि.३०.०४.२०२० पर्यंत लागू करण्यात येत आहेत.

४. सदर परिपत्रक निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

५. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**(कमांडर शिवाजी इंदलकर) (से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**